पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/१९६ / २०१६
दिनांक - २५/०४ /२०१६

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ४/५/२०१६ रोजी दुपारी ३.००वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०४/०५/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख

२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – ०२

दिनांक- **०४/ ०५/२०१६** रोजी वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **बुधवार दिनांक ०४/०५/२०१६ रोजी दु. ३.००** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ३/२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १३) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक २/३/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १४) सभावृत्तांत कायम करणे.

क) दिनांक ६/४/२०१६ रोजी झालेल्या मासिक सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०१) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१–** देहू आळंदी रोड या रस्त्यास सस्ते पाटील मार्ग हे नामकरण होणेबाबत. पुणे नाशिक रोडलगत व हवालदार वस्ती लगतचा मार्ग या ठिकाणी उपरोक्त नावाचे नामफलक लावणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.२ –** जागतिक बँकेच्या सहाय्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका SUTP अंतर्गत शहरात बीआरटीएस कॉरीडॉर विकसीत करीत आहे. त्या अंतर्गत विविध Technical assistance studies साठी जागतिक बँकेकडून GEF Grand मधून सल्लागार नेमण्यात आले आहेत. त्यापैकी Parking Policy & Master Plan यासाठी UMTC New Delhi यांची सल्लागार म्हणून महानगरपालिके मार्फत नेमणूक करण्यात आली आहे. सदर सल्लागारांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध भागाचे सर्वेक्षण व अभ्यास करुन पार्किंग पॉलीसीचा मसुदा तयार केला आहे. सदर पार्किंग पॉलिसीच्या मसुदयाचे सादरीकरण मा.नगरसदस्यांना प्रभाग स्तरावर सादर करणे आवश्यक आहे. तरी येत्या प्रभाग समितीच्या बैठकी दिवशी सदर सादरकरणे करण्याकामी सभे नंतर वेळ निश्चीत करणेबाबत विचार करणे.

-------

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/१९६ /२०१६
दि. २५/०४ /२०१६